महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास वेतनेतर बाबींकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल२०१७ ते माहे जुलै,२०१७ अखेरपर्यंत निधी वितरीत करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- राअआ/२०१७/प्र.क्र.५५/का-९**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दि. १९ मे, २०१७.

**वाचा :-**

(१) शासन परिपत्रक, अल्पसंख्यांक विकास विभाग क्र. अविवि- २०१७/प्र.क्र. ३१/का-७, दि. १९ एप्रिल, २०१७.
(२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र.६८/अर्थसंकल्प-३, दि. ०१ एप्रिल, २०१७.
(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थसंकल्प-३, दि. १८ एप्रिल, २०१७.
(४) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे पत्र क्र.राअआ/लेखा/प्र.क्र.१/ का-४/ २०१६-१७, दि. १६/०५/२०१७.

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयास सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल, २०१७ ते जुलै, २०१७ या चार महिन्यांचा वेतनेतर खर्च भागविण्याकरिता मंजूर अर्थसंकल्पित निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१)(१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९, (योजनेतर/दत्तमत) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशीर्षांतर्गत माहे एप्रिल,२०१७ ते मार्च,२०१८ साठी ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली रु.६० लाख एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. माहे एप्रिल, २०१७ ते डिसेंबर, २०१७ करिता सदर मंजूर निधीच्या ८० टक्के निधी मर्यादेपर्यंत वितरीत करण्यासाठी उपरोक्त क्र. १ व २ येथील शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र. (३) येथील शासन परिपत्रकान्वये अर्थसंकल्पित तरतुदीच्या ८०% च्या मर्यादेत मंत्रालयीन विभागांना अनुदान वितरित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयासाठी ८०% च्या मर्यादेत राहून माहे एप्रिल, २०१७ ते जुलै, २०१७ या चार महिन्यांकरिता ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली रू.१५,००,०००/-(अक्षरी रुपये पंधरा लक्ष फक्त) इतके अनुदान खाली दर्शविलेल्या निधी विवरणाप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे. सदर मंजूर निधी सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

| | | **मागणी क्र.झेडई-१ २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१)(१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९, (योजनेतर/दत्तमत )३१, सहायक अनुदान (वेतनेतर)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | आयोगास वितरीत करावयाचा निधी | | | |
| अ. क्र. | तपशीलवार लेखाशीर्ष | सन २०१७-१८ साठी अर्थ संकल्पीय अंदाज पुस्तिकेत दर्शविण्यात आलेले अनुदान | एप्रिल, २०१७ | मे, २०१७ | जून, २०१७ | जुलै, २०१७ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २२३५ ए २४९ | ६०,००,०००/- | ३,७५,०००/- | ३,५०,०००/- | ४,५५,०००/- | ३,२०,०००/- |
| | | **एकूण** | **रु. १५,००,०००/- ( अक्षरी एकूण रूपये पंधरा लक्ष फक्त)** | | | |

२. सदर निधी सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत असून याकरिता ते आहरण व संवितरण आणि नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने सन २०१७-१८ च्या मासिक निधी विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे आपल्या कार्यालयाचा खर्च विहित मर्यादेपर्यंतच राहील याची दक्षता घ्यावी. या आदेशान्वये वितरित करण्यात आलेल्या रकमेमधून केलेल्या खर्चाचा तपशील, उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) तसेच संदर्भ क्र.२ शासन परिपत्रक, वित्त विभाग अन्वये विहित अटी व तरतुदींचे पालन महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने करावे.

३.  उपरोक्त रक्कम २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाज कल्याण, २००, इतर कार्यक्रम (०१) (१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९, (योजनेतर/दत्तमत) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) या उप लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

४.  "सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,दि.१७एप्रिल,२०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या त्या विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग (१) क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र.६८/अर्थसंकल्प-३, दि. ०१ एप्रिल, २०१७. आणि (२) अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थसंकल्प-३, दि.१८एप्रिल, २०१७ मधील अटींची पुर्तता होत असून, प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. "

५.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०५१९१५२६५३८२१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Shamlal R Chaure

Digitally signed by Shamlal R Chaure
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minority, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f297dc66bbf139a70b9a7f405528e31889008 7680cc7a9c0ce19f213232572bd, cn=Shamlal R Chaure
Date: 2017.05.19 15:30:55 +05'30'

(श्या.र.चौरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
२) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य,मुंबई / नागपूर,
३) संचालक, लेखा व कोषागारे,
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व),
७) अवर सचिव, ( व्यय-४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
८)कक्ष अधिकारी, (का-७) , अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
९) निवडनस्ती (कार्यासन-९)